संशोधन आराखडा

“नांदेड जिल्ह्यातील जमीन धारणेनुसार शेतकऱ्यांचे उत्पन्न, बचत, गुंतवणूक व उत्पादन खर्चाचा अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)

या पदवीकरिता सादर केला जाणारा संशोधन आराखडा

संशोधक

घोनशेट्टे सोपान काशिनाथराव

मार्गदर्शक

प्रो.डॉ. कोरपकवाड एकनाथ देवराव

अर्थशास्त्र विभागप्रमुख

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

संशोधन केंद्र

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

मार्च - २०२२

“नांदेड जिल्ह्यातील जमीन धारणेनुसार शेतकऱ्यांचे उत्पन्न, बचत, गुंतवणूक व उत्पादन खर्चाचा अभ्यास”

प्रस्तावना

जगातील एक प्रमुख कृषिप्रधान देश म्हणून भारताला ओळखले जाते. भारतातील शेती व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणाच होय. विकसित देशांपेक्षा विकसनशील देशांमध्ये शेतीला उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणून पाहिले जाते. कृषी क्षेत्रातील विकास देशाच्या उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासासाठी मदत रूप ठरतो. भारतात सन १९५०-५१ मध्ये नियोजनाला सुरूवात झाली. त्यावेळी देशातील एकूण कार्यक्षम लोकसंख्येपैकी ६५ टक्के लोक शेतीवर अवलंबून असताना देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये याच शेती क्षेत्राचा वाटा ५६.४६ टक्के एवढा होता. तसेच एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी एकूण पिकाखालील क्षेत्र १३३.२ दशलक्ष हेक्टर एवढे होते. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात उद्योगांचा विकास झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी झाला असला तरी अजूनही शेतीला इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा महत्त्वाचे स्थान आहे. शेती उत्पादन वाढीला साहाय्य व्हावे या दृष्टीने १९४७ नंतर भारतात जमीन विषयक अनेक सुधारणा करण्यात आल्या. त्यात तुकडे जोड व तुकडे बंदी, मध्यस्थ नष्ट करणे, भूधारणा क्षेत्रावर कमाल मर्यादा, कूळ कायदे इत्यादींचा समावेश आहे.

भारतात जमीन धारणेवरून शेतकऱ्यांचे सिमांत शेतकरी, लहान शेतकरी, अर्धमध्यम शेतकरी, मध्यम शेतकरी व मोठे शेतकरी असे पाच गट आहेत. भारत सरकारच्या कृषी मंत्रालयाने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार भारतात सिमांत व लहान धारणक्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांची एकूण संख्या १९८०-८१ मध्ये अनुक्रमे ५६.४ टक्के व १८.१ टक्के इतकी होती. म्हणजेच १९८०-८१ मध्ये भारतातील ७४.५ टक्के शेतकऱ्यांकडे पाच एकरपेक्षा कमी धारणक्षेत्र होते. एकूण सिमांत क्षेत्र शेतकऱ्यांकडे १२.१ टक्के व लहान शेतकऱ्यांकडे १४.१ टक्के अशी एकूण केवळ २६.२ टक्के जमीन होती.

अलीकडील काळाचा विचार करता सन २०१०-११ मध्ये भारतात सिमांत धारण क्षेत्र असणारे ६७.१ टक्के शेतकरी व लहान धारण क्षेत्र असणारे १७.९ टक्के शेतकरी असे मिळून ८५ टक्के शेतकरी आहेत. त्यांच्या वाट्याला पाच एकर किंवा दोन हेक्टरपेक्षा कमी धारण क्षेत्र आहे. सन २०१०-११ मध्ये सिमांत शेतकऱ्यांकडे २२.५ टक्के व लहान शेतकऱ्यांकडे २२.१ टक्का अशी एकूण ४४.६ टक्के जमीन होती. एकंदरीत १९८०-८१ मध्ये २६.२ टक्के जमिनीवर ७४.५ टक्के सिमांत व लहान शेतकरी अवलंबून होते आणि अर्धमध्यम, मध्यम व मोठे असे मिळून २५.५ टक्के शेतकऱ्यांकडे ७३.८ टक्के धारणक्षेत्र होते. सन २०१०-११ मध्ये सिमांत व लहान शेतकऱ्यांची संख्या ८५ टक्क्यांपर्यंत वाढलेली होती. त्यांच्या वाट्याला एकूण क्रियाशील धारण क्षेत्राच्या ४२.६ टक्के जमीन होती. उरलेल्या १५ टक्के अर्धमध्यम, मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांकडे एकूण क्षेत्राच्या ५५.४ टक्के शेतजमीन होती. यावरून भारतातील धारण क्षेत्राच्या विभागणीतील विषमता प्रकर्षाने समोर येते. जमिनीचे लहान-लहान तुकड्यात झालेले विभाजन आणि अपखंडन शेतीच्या उत्पादकतेवर विपरीत परिणाम करतात म्हणून भारतातील सिमांत व लहान शेतकऱ्यांना एकत्र आणून सामूहिक शेतीच्या माध्यमातून समस्यांवर उपाय शोधणे गरजेचे आहे.

विषय निवडीमागील भूमिका

भारतातील ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्येसाठी शेती हा जगण्याचा मुख्य स्रोत आहे आणि राष्ट्रीय उत्पन्नात याच कृषी क्षेत्राचा वाटा १३ टक्के एवढाच आहे. कृषी क्षेत्रातील उत्पन्न कमी असण्याची कारणे अनेक आहेत त्यातील प्रमुख कारण जमीन धारण क्षेत्र होय. बागायती व कोरडवाहू शेतकऱ्यांच्या जमीन धारणाकाराचा शेतकऱ्यांच्या उत्पन्न, बचत, गुंतवणूक व उत्पादन खर्चावर परिणाम होत असतो. म्हणून बागायती व कोरडवाहू शेतकऱ्यांच्या जमीन धारणाकार व शेतकऱ्यांचे उत्पन्न, बचत, गुंतवणूक व उत्पादन खर्च यांचा संबंध अभ्यासण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

अभ्यास विषयाची उद्दिष्टे

१) बागायती व कोरडवाहू शेतकऱ्यांच्या धारणाकार व उत्पादन घटकांचा संबंध तपासणे.

२) उत्पन्न, बचत, गुंतवणूक व उत्पादन खर्च यांचा बागायती व कोरडवाहू शेतकऱ्यांचा सहसंबंध प्राक्कलीत करणे.

३) जमीन धारणाकार उत्पादन खर्च व उत्पादकता यांचा संबंध तपासणे.

४) कृषी गुंतवणूकीची साधने अभ्यासणे.

अभ्यास विषयाची गृहितके

१) कृषी क्षेत्राचे उत्पन्न त्यांच्या आकारमानावर अवलंबून असते.

२) कृषी उत्पादकता व कृषी धारणाकाराचा धन संबंध आहे.

३) धारणाकारानुसार उत्पादन खर्च बदलणारा असतो. लहान शेतकऱ्यांचा प्रति हेक्टरी उत्पादन खर्च अधिक असतो. याउलट मोठ्या शेतकऱ्यांचा प्रति हेक्टरी खर्च कमी असतो. मितव्ययता यास कारणीभूत असते.

४) अल्प उत्पन्न यामुळे लहान शेतकऱ्यांकडे बचत व गुंतवणूकीचा अभाव दिसून येतो.

५) कृषी क्षेत्राच्या विकासात न्यून उत्पादकता ही समस्या आहे व त्याचे मुख्य कारण शेतीच्या लहान तुकड्यांमुळे न परवडणारी गुंतवणूक आहे.

अभ्यास विषयाचे महत्त्व

नांदेड जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. नांदेड जिल्ह्यात शेती क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण १९९१ मध्ये ७८.५ टक्के होते. जिल्ह्याच्या विकासात व रोजगार निर्मितीत कृषीचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. शेतीची लाभक्षमता धारणक्षेत्राच्या प्रमाणात वाढत जाते. कारण, ती उत्पादनाच्या अधिक यांच्या आधारे मोजली जाते आणि ते अधिक उत्पादनाच्या मूल्याच्या आधारे मोजली जाते. कृषी उत्पादकता व धारणाकार यांचा धन संबंध आहे. एकत्रित जमीन धारण क्षेत्रांचा बागायती व कोरडवाहू शेतकऱ्यांच्या उत्पन्न, बचत, गुंतवणूक व उत्पादन खर्चावर परिणाम होत असतो म्हणून या गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील जमीन धारणेनुसार शेतकऱ्यांच्या उत्पन्न, बचत, गुंतवणूक व उत्पादन खर्च यांचा अभ्यास हा विषय निवडला आहे.

अभ्यास विषयाची व्याप्ती

भौगोलिक क्षेत्र

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्याची निवड करण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्यात एकूण १६ तालुके आहेत. त्यापैकी ४ तालुक्यातून प्रत्येकी एक गाव संपूर्ण सर्वेक्षणासाठी निवडले जाईल व नमुना निवड पद्धतीचा वापर करून सर्व १६ तालुक्यातील ४८० शेतकरी कुटुंबाचे प्रश्नावलीच्या माध्यमातून सर्वेक्षण केले जाईल. गावांची व कुटुंबाची निवड करताना कोरडवाहू व बागायती शेतकरी जमीन धारणाकारानुसार निवडण्यात येतील.

अभ्यासाचा कालावधी

निवडलेल्या कुटुंबाची वर्ष २०२१-२२ मधील संरचित प्रश्नावलीच्या मदतीने शेतकऱ्यांच्या जमीन धारणाकारानुसार आणि उत्पन्न, बचत, गुंतवणूक, उत्पादन खर्चासंबंधी प्राथमिक माहिती संकलित करण्यात येणार आहे. तर द्वितीय माहिती वर्ष २०१०-११ ते २०१९-२० मधील कृषी संबंधित प्रकाशित व अप्रकाशित माहितीचा आधार घेण्यात येणार आहे.

संशोधन पद्धती

१) क्षेत्राची निवड

नांदेड जिल्ह्यात एकूण १६ तालुके असून त्यापैकी ४ तालुक्यांतून प्रत्येकी एक गाव संपूर्ण सर्वेक्षणासाठी निवडले जाईल व संपूर्ण १६ तालुक्यातून नमुना अभ्यासासाठी ४८० कुटुंबाची निवड केली जाईल. गावाची व कुटुंबाची निवड करताना कोरडवाहू व बागायती शेतकरी जमीन धारणाकारानुसार निवडले जातील.

२) द्वितीयक सामग्री संग्रहण

द्वितीयक सामग्री संग्रहनासाठी वर्ष २०१०-११ ते २०१९-२० या दहा वर्षाच्या कालावधीतील भारत व महाराष्ट्र सरकारच्या प्रकाशित व अप्रकाशित माहितीचा आधार घेण्यात येणार आहे. भारत सरकारच्या कृषी मंत्रालयाची, वित्त मंत्रालयाची प्रकाशित साधने, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण, महाराष्ट्र अर्थ व सांख्यिकी संचालनालयाची प्रकाशित

अहवाले, महाराष्ट्र कृषी व वित्त मंत्रालयाची प्रकाशित साधने, नांदेड जिल्ह्याविषयी अर्थ व सांख्यिकी संचालनालयाची प्रकाशित साधने इत्यादींचा वापर करण्यात येणार आहे.

विश्लेषण पद्धती व तंत्र

निवडलेल्या गावांविषयी माहिती संकलित करून त्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सारणीयन, आलेखन यासारख्या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करण्यात येणार आहे. उत्पादन खर्चावर परिणाम करणाऱ्या घटकांची प्रतिगमन समीकरणे काढून त्यांच्या परिणामांची योग्य ती सांख्यिकीय चाचणी केली जाईल. तसेच उत्पन्न, बचत, गुंतवणूक या घटकांची स्वतंत्र चले गृहीत धरून प्रतिगमन समीकरणे तयार केले जातील. यावरून उत्पादन खर्च व धारणाकार संबंधीचे निष्कर्ष काढले जातील.

प्रकरण विभागणी

प्रस्तुत संशोधन अभ्यास एकूण सहा प्रकरणात विभागण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले

अ) प्रस्तावना

या प्रकरणात भारतीय कृषीचा इतिहास अभ्यासण्यात येणार आहे. तसेच जमीन धारणेसंबंधी व्याख्या, अभ्यास विषयामागील भूमिका, अभ्यास विषयक संकल्पनांचे स्पष्टीकरण, अभ्यास विषयाची उद्दिष्टे, अभ्यास विषयाचे महत्त्व, गृहितके, व्याप्ती, अभ्यास विषयाचे क्षेत्र, कालावधी, संशोधन पद्धती, क्षेत्राची निवड, गावाची निवड, वर्गवारी, प्राथमिक सामग्री संग्रहण पद्धती द्वितीय सामग्री संग्रह पद्धत, विश्लेषण व तंत्र प्रतिगमन विश्लेषण व प्रकरण विभागणीची रूपरेषा या घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

ब) नांदेड जिल्ह्यातील कृषी विषयक योजना

या प्रकरणात महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यामध्ये भारत व महाराष्ट्र सरकारने राबविलेल्या कृषीविषयक योजनांचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यात दहा हजार शेतकरी उत्पादक संस्थांची निर्मिती व प्रोत्साहन, विकेल ते पिकेल अभियान (२०२०), अल्प व अल्पभूधारक यांच्यासाठी असणारी प्रधानमंत्री किसान मानधन योजना, गट शेतीस

प्रोत्साहन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम, पंतप्रधान कृषी सिंचन योजना इत्यादी योजनांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे

साहित्य सामुग्री आढावा

या प्रकरणात संशोधन विषयाच्या अनुषंगाने संबंधित शोध प्रबंधाचा, शोध निबंधाचा आणि संशोधनाशी संबंधित साहित्य यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

नांदेड जिल्ह्याची कृषी अर्थव्यवस्था

या प्रकरणात नांदेड जिल्ह्याचे भौगोलिक स्थान व विस्तार, क्षेत्रफळ, नकाशा, इतिहास, नांदेड जिल्ह्याची भौगोलिक वैशिष्ट्ये व खनिजे, पर्जन्यमान, लोकसंख्या विषयक वैशिष्ट्ये, साक्षरता, स्त्री-पुरुष प्रमाण, घनता, कृषी अर्थव्यवस्था, लागवडीखालील क्षेत्र, उत्पादकता, जमीन धारणेचे वर्गीकरण इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे

बागायती व कोरडवाहू शेतकऱ्यांची उत्पन्न, बचत व गुंतवणूक विषयक स्थिती

जमीन ही एक नैसर्गिक संसाधन आहे ती सर्व मानवी आर्थिक क्रियाकलपाच्या केंद्रस्थानी आहे. शेत जमिनीचे लागवडीनुसार बागायती व कोरडवाहू असे वर्गीकरण करण्यात आले आहे. बागायती जमीन लागवड ही मुख्यतः पावसाळ्या व्यतिरिक्त इतर पाण्याच्या स्रोतांवर अवलंबून असते. त्यात बंधारे, कालवे, विहिरी, कूपनलिका तर कोरडवाहू शेती वार्षिक पावसावर अवलंबून असते. या प्रकरणात नांदेड जिल्ह्यातील जमीन धारणाकारानुसार बागायती व कोरडवाहू शेतकरी यांच्या उत्पन्न, बचत, गुंतवणूक या विषयक स्थितीच अभ्यास करण्यात येईल. जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे बदलणारे उत्पादन, खर्च प्रति हेक्टरी उत्पादन, गुंतवणूक व गुंतवणूकीची साधने याविषयीचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे

जमीन धारणाकार, उत्पादन खर्च व उत्पादकता

या प्रकरणात शेतकऱ्यांच्या जमीन धारणाकारानुसार उत्पन्न, बचत, गुंतवणूक व उत्पादन खर्च यांचा सहसंबंध प्राक्कलित करण्यात येणार आहे. बागायती व कोरडवाहू जमिनीनुसार दर हेक्टरी उत्पादन, उत्पादन खर्च, प्रति हेक्टरी गुंतवणूक, प्रति हेक्टरी बचत यांचा सांख्यिकीय, गणितीय साधने वापरून अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सहावे

सारांश, निष्कर्ष, उपाययोजना व शिफारशी

या प्रकरणात प्रत्येक प्रकरणाचा सारांश मुद्देनिहाय, प्रकरण निहाय निष्कर्ष अभ्यास विषयाशी संबंधित समस्या, त्या सोडवण्यासाठी उपाययोजना, संशोधनातील त्रुटी, मर्यादा, पुढील संशोधनासाठी सूचना इत्यादी घटकांचा समावेश करण्यात येणार आहे.

संदर्भ

१) कृषी सांख्यिकी आकडेवारी, भारत सरकार

२) भारतीय अर्थव्यवस्था-दत्त सुंदरम, ४८ वी आवृत्ती

३) वार्षिक अहवाल कृषी व किसान कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली, २०२०

४) कृषी अर्थव्यवस्था-डॉ.वसुधा पुरोहित, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद

५) कृषी अर्थव्यवस्था-कविमंडन विजय, २००९, नागपूर

६) भारतीय अर्थव्यवस्था-देसाई व भालेराव, निराली प्रकाशन

७) आर्थिक समीक्षा २००७-०८, भारत सरकार

८) Economic Survey of India-2020

९) www.igidr.ac.in

१०) महाराष्ट्र संक्षिप्त सांख्यिकी-२०१७

११) महाराष्ट्र आर्थिक पाहणी-२०२०

१२) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई-२०२०

१३) krishi.maharashtra.gov.in

१४) wikipedia

१५) Hornet, Ministry of Agri and Farmers Welfare, Govt. of India

१६) The Nature of Capital and Income, Fisher Irving

१७) Directorate of Economics and Statistics, Ministry of Food and Agriculture, Govt. of India

परिशिष्ट

१) नमुना प्रश्नावली (गावासाठी)

२) नमुना प्रश्नावली (शेतकऱ्यांसाठी)

मार्गदर्शक

प्रो.डॉ.कोरपकवाड एकनाथ देवराव

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

जि.लातूर

संशोधक

घोनशेट्टे सोपान काशिनाथराव